

इसापनीती
मोहन रावळ
परी प्रकाशन

इसापनीती

◆ ——————

© सुरक्षित

◆ ——————

**प्रकाशक :**
**परी प्रकाशन**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

◆ ——————

**प्रमुख वितरक**
**अजब डिस्ट्रिब्युटर्स**
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी २ री गल्ली, कोल्हापूर.

**मुखपृष्ठ :**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

◆ ——————

**मुद्रक :**
जयंत प्रिंटरी

◆ ——————

**आवृत्ती :**
२९ ऑगस्ट, २०१३

◆ ——————

**किंमत :**
रुपये १२०/-

# अनुक्रमणिका


१. दैव जाणिले कुणी ? /५
२. एकतर्फी विचार घातक /५
३. एकदा नव्हे, दोनदा चूक /६
४. थट्टा भोवली /६
५. नुसता आवाज मोठा /७
६. सावध राहिले पाहिजे /७
७. सोंगाड्या लांडगा /७
८. पश्चात्ताप /८
९. हपापाचा माल गपापा /८
१०. सांगणे सोपे असते... /९
११. औदार्य आणि भीक /९
१२. हेही गेलं आणि तेही /१०
१३. चित्र पालटले असते... /१०
१४. विश्वासघातकी /११
१५. शहाणपणा /११
१६. फुकटच्या बढाया /११
१७. पोटात एक ओठात एक /१२
१८. माणसाचा मुखवटा /१२
१९. इसापचे मत /१३
२०. सिंहाचे सोंगढोंग /१४
२१. स्वभावाला औषध नाही /१४
२२. काळ हाच उपाय /१५
२३. तिसऱ्याला लाभ /१५
२४. अक्कलशून्य /१६
२५. चुकलेली उडी /१६
२६. शहाणपणा /१७
२७. नंतर सुचला शहाणपणा /१७
२८. अगदी खरं आहे ! /१८
२९. कुवत ओळखा ! /१८
३०. उगाच भीती /१९
३१. दुसरे मरण ! /२०
३२. चुगली अंगाशी आली /२०
३३. नुकसानीचा सल्ला /२१
३४. अवास्तव मागणी /२१
३५. नुसती संख्या नको /२२
३६. विश्वासघाताचे बक्षीस /२२
३७. फुकटच्या सबबी /२२
३८. द्राक्षे आंबट होती /२३
३९. चोर तो चोरच ! /२३
४०. जात लांडग्याची /२४
४१. अहंकार असू नये /२४
४२. विचाराने पाऊल टाका /२५
४३. मूर्खांचा आनंद /२६
४४. फुकटचा डामडौल /२६
४५. उपकाराची फेड /२६
४६. नको तुझी भेट /२७
४७. भलतीच मागणी /२७
४८. नंतरचा पश्चात्ताप /२८
४९. अर्धवट ज्ञान घातक /२८
५०. तुझं तुला लखलाभ /२९
५१. कायमचे वैर /२९
५२. असे असते राजकारण / ३०
५३. गर्वहरण /३०
५४. नशीब काय म्हणाले ? /३१

५५. जीवघेणा खेळ /३१
५६. अनिश्चितपणा /३२
५७. जरा पोटाला घाल /३२
५८. साभार नकार /३२
५९. क्षुद्र मध्यस्थ /३३
६०. एकदा गेला की गेलाच /३३
६१. सावलीचा मालक... /३४
६२. म्हणून शंका आली /३४
६३. झोपाळू कुत्रा /३४
६४. हेही गेले अन् तेही /३५
६५. फुकटचा गर्व /३५
६६. गाढवाचं नशीब /३६
६७. गाढव ते गाढवच ! /३६
६८. मूळ स्वभाव /३६
६९. संगतीचा परिणाम / ३७
७०. श्रीमंत आणि गरीब /३७
७१. लबाड लांडगा /३८
७२. विसर तोट्याचा होतो /३८
७३. मग काय म्हणणार? /३९
७४. गाढव मेले ओझ्याने /३९
७५. तुम्ही गुलामच ! /४०
७६. ज्याची त्याची दृष्टी /४०
७७. दुष्ट स्वभाव /४०
७८. हंसाचे शोकगीत /४१
७९. धडा गिरवला /४१
८०. पोपटाचा नवस /४२
८१. स्वकीयांना जो ठोकरतो /४२
८२. पंगा घेऊ नकोस /४३
८३. ऐकत नाहीस ना ? /४३
८४. देवाचा सल्ला /४३
८५. माझ्याबरोबर तूही /४४
८६. उसना रुबाब /४४
८७. बेडकांचे गाऱ्हाणे /४४
८८. मत्सरी अस्वल /४५
८९. वैराचे कारण /४५
९०. फसवा कोल्हा... /४६
९१. अंदाज चुकीचा ! /४८
९२. जन्मभर घराचे ओझे /४९
९३. कासव जिंकले /४९
९४. घारीने केली नक्कल /५०
९५. अनाठायी विश्वास /५०
९६. माकडाच्या थापा /५१
९७. जशास तसे /५१
९८. आशेची निराशा /५२
९९. उपकाराची फेड /५३
१००. नक्कल अंगाशी आली /५३
१०१. जातीसाठी माती /५४
१०२. नक्कल करू नये /५४
१०३. गरूडाचे तत्वज्ञान /५५
१०४. बोलणे गोड असावे /५५
१०५. आगाऊपणा नडला /५६
१०६. मैना फसली /५७
१०७. मैत्रीचा फायदा /५७
१०८. मैत्री कोणाशी करावी ? /५८
१०९. गुलाम ते गुलामच ! /६०
११०. विश्वासघातकी /६०
१११. दुष्टांवर दया नको /६१
११२. सबब काहीही असो /६१
११३. मांजराचे सोंग /६१
११४. घंटा बांधणार कोण ? /६२
११५. सहनशील रानरेडा /६३
११६. ज्याचा सल्ला... /६३
११७. गर्वाचे घर खाली /६३
११८. विजयाचा अतिरेक नडला /६४
११९. कष्ट दिसत नाही /६४
१२०. नवे आणि जुने /६५
१२१. गाढवाचा गावंढळपणा /६६
१२२. माकड ते माकडच ! /६६
१२३. इकडे आड तिकडे विहीर /६७
१२४. सिंहाच्या भूमिकेत गाढव /६७
१२५. नसता उपद्व्याप /६७
१२६. अति लोभ वाईटच ! /६८
१२७. स्वार्थ फार वाईट /६८
१२८. दोष कुणाचा ? /६९
१२९. कोणी कुणाचे नसते /६९
१३०. दाढीने वजन वाढते का? /७०
१३१. कुत्र्याची चतुराई /७०
१३२. इतरांना कळावे म्हणून ! /७१
१३३. अनाक्रमणाचा करार /७१
१३४. मूर्खपणाचे धाडस /७२
१३५. जीव कोणाला नको ? /७३
१३६. उपयुक्तता पाहून किंमत /७३
१३७. तोट्याचा व्यवहार /७३
१३८. घुबडाचे भाकित /७४
१३९. जो दुसऱ्यावरी विसंबला /७५
१४०. पिसारा की फाफटपसारा /७६
१४१. अस्वलाच्या बढाया /७६
१४२. खोटे जेव्हा खरे वाटते /७७
१४३. उपद्रवी ढेकूण /७८
१४४. कंदीलवाल्याचे मनोराज्य /७८
१४५. उपकार वाया जात नाहीत /७८
१४६. मालकाची दया भोवली /७९
१४७. सन्मान हवाच /७९
१४८. पाचवीला पुजलेले काम /८०
१४९. मला काय माहीत ? /८१
१५०. आहे तिथे सुख /८१
१५१. दान सत्पात्री असावे /८१
१५२. जातभाई जिवावर उठले /८२
१५३. दोन्ही दरडीवर पाय /८३
१५४. कृतघ्नपणा /८३
१५५. अप्रामाणिक /८३
१५६. लाकूडतोड्याचा... /८४
१५७. हार आणि जीत /८५
१५८. एकीत बेकी /८५
१५९. गेले ते दिवस ! /८५
१६०. माझाच फराळ व्हायचा ! /८६
१६१. विचित्र समाधान /८७
१६२. माकड ते माकडच ! /८७
१६३. कमी पडले की... /८७
१६४. खरा धोका तुझाच ! /८८
१६५. प्रामाणिकपणा /८८
१६६. मैत्रीची चव /८९
१६७. अतिलोभ असू नये /८९
१६८. माझंच मूल सुंदर /९०
१६९. डोकेबाज कावळा /९०
१७०. उलट परिणाम /९१
१७१. तक्रारीची सवय /९१
१७२. स्वार्थी माणसं /९१
१७३. उंचीवरच्या गप्पा /९१
१७४. तेव्हा आणि जेव्हा /९२
१७५. दु:खाचे कारण /९२
१७६. बाप स्वर्गाला गेला /९३
१७७. मूर्तीमंत भीती उभी /९३

१७८. थापाडे अस्वल /९४
१७९. खेकड्याने घडवली अद्दल /९४
१८०. नक्की खरं काय ? /९६
१८१. चहाडखोर मांजरी /९६
१८२. दोघांचे भांडण /९७
१८३. म्हणून तर... /९८
१८४. फुकटची दमबाजी /९९
१८५. चोरट्याची साक्ष /९९
१८६. लाल कोल्हा /९९
१८७. भलताच आत्मविश्वास /१००
१८८. हिऱ्याची किंमत /१००
१८९. सोयीचे मागणे /१०१
१९०. खोटा कळवळा /१०१
१९१. दुसऱ्या सांगे ब्रह्मज्ञान /१०२
१९२. मूर्खा तू फसलास ! /१०२
१९३. गोड आमिष /१०३
१९४. कसंही वागलं तरी... /१०३
१९५. स्वातंत्र्य आणि पारतंत्र्य /१०४
१९६. अडेलतट्टू /१०५
१९७. खेचराचा आशाभंग /१०६
१९८. जगण्यातला फरक /१०६
१९९. सूचक स्वप्न /१०७
२००. वाईट आणि चांगले /१०८
२०१. सांगतात एक... /१०८
२०२. समोर मृत्यू आला /१०९
२०३. चोर कोण, शिक्षा... /११०
२०४. न्याय आणि अन्याय /११०
२०५. हरवले ते गवसले का /१११
२०६. विकतचा शहाणपणा /१११
२०७. नशिबाचा फेरा /१११
२०८. देखणा कोण ? /११२
२०९. पळपुटा खंड्या /११२
२१०. भिंतीवरचा आरसा /११३
२११. डोमकावळ्याचे .../ ११४
२१२. समुद्र शांत कसा ? /११४
२१३. उंटाला वेसण /११४
२१४. मूळ आणि खूळ /११५
२१५. आंधळ्याचे निदान /११६
२१६. गाढव गेले भीतीने /११६
२१७. दोन तऱ्हेच्या दोघीजणी /११८
२१८. सवयीचे गुलाम /११८
२१९. फु कटची बढाई /११९
२२०. कुणी इथे ना भला... /११९
२२१. प्रकृती आणि काळजी /१२०
२२२. खरे मित्र /१२०
२२३. मग मी मरेन ! /१२१
२२४. एकी टिकवा /१२१
२२५. ही वेळ आली नसती /१२२
२२६. अर्ध्याचा नवस /१२३
२२७. अक्कल खाते /१२३
२२८. सिंहाचा वाटा /१२३
२२९. वाघाची चाल /१२४
२३०. मनुष्य आणि पशू /१२४
२३१. समजुतीचा घोटाळा /१२५
२३२. शिरजोर /१२५
२३३. चांगल्यातून वाईट... /१२६
२३४. करावे तसे भरावे /१२७
२३५. कुठेच थारा नाही /१२७
२३६. सत्याचे दुःख /१२८
२३७. ज्याचं करावं भलं... /१२८
२३८. गुराख्याचा नवस /१२९
२३९. कोल्ह्याचा नवस /१२९
२४०. अतिलोभ नडला /१३१
२४१. दुसऱ्याला दोष देणे सोपे /१३१
२४२. स्वभावच तसा /१३२
२४३. मतलबाचे असेल तर /१३२
२४४. चारींचा अर्थ एकच /१३३
२४५. वरकरणी माया /१३३
२४६. व्यर्थ पुंगीवादन /१३४
२४७. खरे कारण /१३४
२४८. आदर्शवादाबद्दल शंका /१३५
२४९. आत्मस्तुती आणि भान /१३५
२५०. मी एक मूर्ख /१३६
२५१. विचार करणे फायद्याचे /१३६
२५२. प्राण्यांचे चांगले गुण /१३७
२५३. तह आणि मर्यादा /१३७
२५४. सरळ रस्ताच उत्तम /१३८
२५५. देव नाही देवाघरी /१३८
२५६. फसवणुकीचा धंदा /१३९
२५७. देव ऐकेल का ? /१३९
२५८. फुकटचा रुबाब /१४०
२५९. देव माणसात... /१४०
२६०. जीवनातील चढ– उतार /१४१
२६१. सजीव की निर्जीव ? /१४२
२६२. तुझी किंमत शून्य /१४२
२६३. सरळ व्याज /१४३
२६४. वक्री आणि मार्गी /१४३
२६५. संकट आणि धीर /१४४
२६६. माणसांची तक्रार /१४४
२६७. कोल्ह्याचा उदारपणा /१४४
२६८. जातोस तर जा ! /१४५
२६९. आता सावकाश जा /१४६
२७०. प्राणाशी गाठ /१४६
२७१. मोठा चोर, लहान चोर /१४६
२७२. प्रसंग पाहून बोलावे /१४७
२७३. अन्याय /१४८
२७४. उलटे कबूतर /१४८
२७५. डासाचे आव्हान /१४८
२७६. आवाज गोड कसा ? /१४९
२७७. उपकाराची फेड... /१४९
२७८. वानराचा पूर्वइतिहास /१५०
२७९. उद्याचा विचार /१५०
२८०. नमते घेणे हिताचे ! /१५१
२८१. झेंडू आणि गुलाब /१५२
२८२. अयोग्य तक्रार /१५२
२८३. कशासाठी ?... /१५२
२८४. स्वातंत्र्यासाठीच ! /१५३
२८५. स्वार्थी मूर्तीकार /१५४
२८६. शंभर फटके मोजून ! /१५४
२८७. मूर्ख नाकतोडा /१५५
२८८. खेचरांचा गोंधळ /१५५
२८९. दुसऱ्यास ब्रह्मज्ञान /१५६
२९०. अकलेच्या नावाने... /१५६
२९१. मिळालं काय ? /१५७
२९२. चिचुंद्रीचा उपदेश /१५७
२९३. संताप नुकसानकारक /१५८
२९४. देवाला दोष कशाला ?/१५९
२९५. दोष शोधत बसू नका /१५९
२९६. थट्टा अंगाशी आली /१६०

# इसापनीती

## दैव जाणिले कुणी ?

एका विशिष्ट जातीच्या माकडीणीला म्हणे जुळीच होतात. एकावर ती माकडीण खूप प्रेम करत राहते. त्याला अजिबात खेळा–बागडायला सोडत नाही. अंगाशी धरून ठेवते, त्याचबरोबर दुसऱ्या पिलाची हेळसांड करते. पण दैवाची लीला अगाध ठरते. जे पिलू सतत मायेने पोटाशी चिकटून रहाते ते गुदमरून जाते आणि ज्याची हेळसांड होत राहते ते पिलू मात्र व्यवस्थित वाढते.

(अर्थ : कितीही काळजी घेतली तरी, दैवापुढे काही मात्रा चालत नाही.)

## एकतर्फी विचार घातक

एक सुंदर हरीण डौलदारपणे सागर किनारी चरत होते. ते दिसायला सुंदर असले तरी, डाव्या डोळ्याने आंधळे होते. हरिणाने विचार केला की डाव्या डोळ्याने आपल्याला काही दिसत नाही. तर तो डोळा समुद्राकडे करावा कारण तेथून कसलाच धोका नाही व उजवा डोळा जंगलाकडे करावा, तेथून जिवाला धोका आहे.



पण झाले उलटेच! काही शिकारी नावेतून समुद्रकिनारी उतरले व त्यांनी हरणाची शिकार केली. मरताना हरीण स्वत:शीच बोलले, ‘किती फालतू नशीब माझं. जंगलाकडून धोका आहे म्हणून चांगला डोळा तेथे ठेवला आणि सावधान राहिलो; पण जी बाजू सुरक्षित समजत होतो, ती समुद्राची बाजूच माझा घात करून गेली.

(अर्थ : ज्या गोष्टी तोट्याच्या वाटत असतात, त्याच बाजू काहीवेळा फायद्याच्या असतात, पण जिथं फायदा वाटतो तीच बाजू नुकसानीची ठरते.)

## एकदा नव्हे, दोनदा चूक

चिचुंद्री या प्राण्याला म्हणे दिसतच नाही. ते बेधडकपणे चूं चूं करत घरात शिरते. एक लहानशी चिचुंद्री आपल्या आईला म्हणाली, ‘आई गं, मला आता दिसायला लागलं.’

तिची परीक्षा घेण्यासाठी आईने तिला एक धुपाचा खडा दिला आणि ती म्हणाली, ‘चिंचू, हे काय आहे सांगशील का?’

‘हा एक खडा आहे‘ चिचुंद्री म्हणाली.

‘अगं तुला दिसत तर नाहीच , पण तुला वासही ओळखता येत नाही.’

(अर्थ : आपल्या आवाक्याबाहेरील गोष्टीबद्दल लोक बाता मारतात, तेव्हा कधी कधी ते सोप्या परीक्षेत सपशेल आपटतात.)

## थट्टा भोवली



एका उंदराच्या पिटुकल्याची एका बेडकाशी मैत्री जमली. बेडूक थट्टेखोर होता. त्याला त्या उंदराची थट्टा करण्याची लहर आली व म्हणाला, ‘चल आपण एकमेकांचे पाय बांधू आणि जोडीने शिकार करू.’ भोळसट उंदीर त्याला कबूल झाला. बेडकाने स्वत:च्या पायाला उंदराचा पाय बांधला आणि पाण्यात उडी घेतली. बेडूक मजेत ‘डराव डराव’ चे गाणे गात पोहू लागले. पण उंदीर मात्र नाकातोंडात पाणी जाऊन मेला. त्याचवेळी आकाशात एक घार उडत होती. तिनं मेलेला उंदीर पाहिला आणि वेगाने झपाटा मारून

खाली आली. पायात उंदीर पकडून ती उडत होती. उंदराच्या पायाला बांधला गेल्याने बेडूकही त्याच्याबरोबर लोंबकळत आला. घारीने दोघांचाही फडशा पाडला.

(अर्थ : मेल्यानंतरही सूड उगवता येतो, परमेश्वराच्या घरी न्याय आहे म्हणून अशी थट्टा करू नये.)

## नुसता आवाज मोठा

एकदा एका सिंहाने पावसाळ्यात एक मोठा आवाज ऐकला, सिंहाला वाटले गुहेबाहेर एखादा मोठा प्राणी आला असावा. सिंह गुहेतून बाहेर आला, तर एक बेडूक मोठ्याने ओरडत डबक्यातून बाहेर आला. सिंहाने त्याला पंजाखाली दाबत म्हटले, 'काय रे, एवढासा लहान प्राणी आहेस तू! पण आवाज केवढा काढतोस?'

(अर्थ : काही लोक मोठ्या बाता मारतात, पण त्यांच्या हातून काहीच शौर्य घडत नाही.)

## सावध राहिले पाहिजे

एक रानडुक्कर खैराच्या ओबडधोबड झाडाजवळ उभे राहून त्याच्या खोडावर आपले सुळे घासत होते. एका कोल्ह्याने ते पाहिले व हसत जवळ येत म्हणाला, 'काय हो, कोणी शिकारी तुमच्या मागे नाही. कसलं संकटही आसपास दिसत नाही, मग उगाच कशाला सुळ्यांना घासत धार लावत आहात?'

'कोल्हेबुबा, त्याला कारण आहे.' रानडुक्कर म्हणाले, 'जर संकट चालून आलं तर धार लावायला तरी वेळ मिळेल का? आताच धार लावून ठेवली तर ऐनवेळी त्याचा उपयोग होईल.'

कोल्हा आश्चर्याने पहातच राहिला.

(अर्थ : संकट समोर उभे राहीपर्यंत वाट पाहण्यात अर्थ नसतो, त्यासाठी आधीपासूनच सावध राहिले पाहिजे.)

## सोंगाड्या लांडगा

एका लांडग्याने विचार केला की, आपण जर वेशांतर केले तर आपली खूपच चंगळ होईल. त्याने एका मेंढ्याचे कातडे पांघरले व तेथे चरणाऱ्या मेंढरांच्या कळपात शिरला व त्याने मेंढ्याचे सोंग बेमालूम वठवले. कोणाच्या काही लक्षातच आले नाही. संध्याकाळी मेंढपाळाने सगळा कळप बंदोबस्तात मेंढवाड्यात बंद केला. त्यात हा नकल्या लांडगाही होता. रात्री मेढंपाळाला

भूक लागली. तेव्हा सुरा घेऊन तो मेंढवाड्यात आला. त्याच्या हाताला नेमका हा कातडे पांघरलेला लांडगाच आला. त्याला मेंढपाळाने मेंढरू समजून ठार केले.

(अर्थ : भलतेच सोंग व्यवहारात वठवले की ते अंगाशी येते. त्यात जीवही जाऊ शकतो.)

## पश्चात्ताप

एका धनगराला रानात लांडग्याची पिले सापडली. त्याने काळजीपूर्वक त्यांचे पालन पोषण केले. धनगराला वाटले की, ही पिले मोठी झाल्यावर आपल्या कळपाचे रक्षण करतील शिवाय दुसऱ्याही मेंढ्या पकडून आपल्या कळपात आणतील.

परंतु ही पिले मोठी झाल्यावर तापदायकच बनली. संधी मिळेल तेव्हा आपल्या मालकाच्याच कळपाला उपद्रव देऊ लागली. त्यांचे हे कृत्य पाहून धनगर म्हणाला ‘चांगलीच अद्दल घडली मला. नाहीतरी ही पिल्ले त्यावेळी मोठी असती तर त्यांचा नाश करण्याचा उपाय मलाच करावा लागला असला. ती लहान होती म्हणून त्यांच्यावर दया दाखवण्यात काहीच अर्थ नव्हता.’

(अर्थ : एखाद्या दुष्टाला वाचवून दया दाखवण्यात अर्थ नसतो, कालांतराने तो दुष्ट पुष्ट होऊन आपल्याच नाशाला कारण होतो.)

## हपापाचा माल गपापा

एका लांडग्याने हिमतीने एका कळपातले एक मेंढरू पळवले. वाटेत त्याला सिंह भेटला. त्याने ते मेंढरू हिसकावून घेतले. तेव्हा लांडगा अगदी दूर उभा राहून ओरडला, ‘माझ्या मालकीची वस्तू हिसकावून घेण्याचा तुम्हाला काहीच अधिकार नव्हता हो !’

‘तुझ्या मालकीची वस्तू?’ सिंह हसून म्हणाला, ‘ही वस्तू जशी काय तू प्रामाणिकपणेच मिळवली असशील नाही? सांग बरे कोणत्या मित्राने तुला भेट दिली ?’



लांडगा निरुत्तर झाला.

(अर्थ : हपापाचा माल गपापा होतो. जगात चोरावर मोर आहेतच.)

## सांगणे सोपे असते...

जंगलात लांडग्यांची बैठक चालली होती. विषय होता समाजवाद आणि साम्यवाद. एक लांडगा बैठकीत म्हणाला, 'प्रत्येकाने एक शिकार सर्वात वाटून खाणे म्हणजेच साम्यवाद आहे, आणि भूकेपोटी अनेकांचा जीव घेण्याचे टाळणे हा समाजवाद आहे.' जो कोणी शिकार करेल त्याने केलेली शिकार लांडगे संस्थेत जमा करावी मग ती सर्वांना समान वाटली जाईल. आहे कबूल?'

सर्व लांडगे 'हो' म्हणून ओरडले.

त्याचवेळी एक गाढव ओरडून म्हणाले, 'साम्यवादावर तत्वज्ञान सांगणाऱ्या या लांडग्याने मघाशीच एक शिकार केली आहे. ती त्याने ढोलीत लपवली आहे. ती आधी येथे जमा करावी मगच बोलावे.'

तत्वज्ञान सांगणारा लांडगा गप्प बसला. त्याचा साम्यवाद कोलमडला.

(अर्थ : जे कायद्याचे तत्वज्ञान मांडतात, ते स्वत: मात्र तसे वागत नाहीत.)

## औदार्य आणि भीक

एकदा एका वनराज सिंहाने हरणाची शिकार केली. शिकार पायाशी ठेवून सिंह ऐटीत उभा असताना तेथे एक दरोडेखोर आला व म्हणाला, 'तू शिकार केली आहेस हे कबूल ! मला खूप भूक लागली आहे. यातील काही भाग मला दे.'

त्यावर सिंह म्हणाला, 'तुला मी काही भाग जरूर दिला असता, पण तू दयेला पात्र नाहीस. कारण तू एक निष्णात दरोडेखोर आहेस.' ते ऐकून दरोडेखोर निघून गेला.

नंतर एक दरिद्री माणूस तेथे आला व आशाळभूतपणे शिकारीकडे व सिंहाकडे पहात राहिला. थोडावेळ थांबून तो दरिद्री माणूस निघाला असता, सिंह त्याला म्हणाला, 'अरे तू गरीब आहेस, या शिकारीचे मी दोन भाग करतो. जो भाग तुला हवा असेल तो तू घे. भिक घेताना तुला लाज वाटत असेल तर मी येथून थोडावेळ बाजूला जातो त्याप्रमाणे हरणाच्या प्रेताचे. दोन भाग करून वनराज थोडावेळ जंगलात गेला.

(अर्थ : लोभीपणाने श्रीमंती मिळते, तसेच भिकारी ते तसेच भिकारी राहतात.)

# हेही गेलं आणि तेही

एकदा एका सिंहाला झाडाखाली झोपलेला ससा दिसला. सिंह त्याची शिकार करण्याच्या विचारात असतानाच त्याला एक हरीण दिसले. सिंहाने सशाला सोडले व तो हरणाच्या मागे धावू लागला. खूप धावाधाव करूनही ते हरीण त्याच्या हाती लागलेच नाही. सिंह मग सशाच्या शिकारीसाठी झाडाजवळ आला, पहातो तर ससाही त्या आवाजाने पळून गेला होता.

ते पाहून सिंह दु:खी अंत:करणाने स्वत:शीच म्हणाला, 'हातचे सोडून मी पळत्याच्या पाठी लागलो. त्याची मला अद्दल घडली.'

(अर्थ : हमखास मिळणाऱ्या छोट्या नफ्याऐवजी, जे लोक जास्ती मिळावे म्हणून धावपळ करतात ते आपला नक्की मिळणारा फायदा घालवून बसतात.)



# चित्र पालटले असते...

एकदा एक सिंह व एक मनुष्य जोडीने प्रवास करत होते. दोघेही आपल्या शौर्याच्या बढाया मारत होते. ते रस्त्याने जात असताना एका भिंतीवर कोरलेले चित्र त्यांना दिसले. त्या चित्रात एक मनुष्य एका सिंहाचा गळा दाबत असलेले दाखवले होते. त्या चित्राकडे बोट दाखवून मनुष्य सिंहाला हसत म्हणाला, 'पाहिलंस मनुष्याची ताकद अशी आहे. माणसंच सर्वश्रेष्ठ बलवान आहेत.'

त्याचे बोलणे ऐकून सिंह गालातल्या गालात हसत म्हणाला, 'ते चित्र ठीक आहे. पण लक्षात ठेव सिंहाना जर दगडावर खोदकाम येत असते तर, चित्र पालटले असते. तेथे सिंह मनुष्याच्या छाताडावर बसलेला दिसला असता!'

(अर्थ : अनेकजण बढाया मारून आपले श्रेष्ठत्व सांगतात, पण प्रत्यक्ष कठीण कसोटीच्या वेळी मात्र उघडे पडतात.)